आत्मदीपो भव !

# रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनी
Rambhau Mhalgi Prabodhini

संस्था बांधणी आणि नेतृत्व अध्ययन केंद्र

**समर्थ भारत - जागर समाजकार्याचा - स्वयंसेवक संमेलन - कार्यक्रम अहवाल**

दिनांक ६ मार्च २०१७

मागील वर्षी पुणेमहानगरामध्ये "शिवशक्ती संगम" हे स्वयंसेवकांचे विराट संमेलन घेण्यात आले होते. यामध्ये स्वयंसेवकांच्या सहकार्याने त्यांच्या कौशल्य व आवड यांच्यावर आधारित समाजातील विविध सामाजिक व स्वयंसेवी संस्थांना योगदान देऊन त्यांच्या कर्तृत्वाचा उपयोग भारताच्या विकासासाठी व्हावा. म्हणून राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने **'समर्थ भारत'** योजनेची आखणी केली आहे.

राष्ट्रीय विचारांशी संलग्न होऊन ज्यांना सामाजिक कार्य करायचे आहे, अशा समाजातील व्यक्ती, संघटना व संस्थांना एक व्यासपीठ उपलब्ध करून देणे, अनेक चांगल्या व्यक्तींपर्यंत पोहोचून त्यांना त्यांचा वेळ, कौशल्य व आवडीनुसार सामाजिक कामांशी जोडणे, विविध स्वयंसेवी संस्थांना सक्षम करण्यासाठी स्वयंसेवक उपलब्ध करून देणे आणि समाजातील काही विविध समस्या सोडवण्यासाठी पुढाकार घेऊन रचनात्मक कार्य उभे करणे या उद्देशांनी समर्थ भारत ही योजना राष्ट्रकार्यात आपले योगदान देण्यासाठी एक दूवा ठरेल.

वरिल उद्देशपूर्तीसाठी **रविवार, दिनांक ५ मार्च २०१७** रोजी **सकाळी ९ ते सायंकाळी ५ पर्यंत** समर्थ भारतकडून स्वयंसेवक जोडणी अभियानाचे आयोजन पुण्यातील सर परशुरामभाऊ महाविद्यालयाच्या आवारात करण्यात आले होते. सुरवातीला अभियानासाठी आलेल्या सर्व संस्थांची नोंदणी करुन घेण्यात आली. त्यानंतर संमेलनाचे उद्घाटन इस्कॉन इंटरनॅशल, मुंबई संस्थेचे **मा. श्री. स्वामी गोविंद प्रभू** यांच्या हस्ते झाले. त्यानंतर समर्थ भारततर्फे **श्री. मंगेश घाटपांडे** यांनी कार्यक्रमाची संकल्पना स्पष्ट केली. "समर्पणातून समाजामध्ये सेवाकार्याचा विस्तार होतो त्यासाठी नागरिकांमध्ये सेवाकार्याची व समर्पणाची वृत्ती जागवली तर समर्थ भारतचे रूप जगाला दिसेल" असा विश्वास श्री. स्वामी गोविंद प्रभू यांनी आपल्या मनोगतामध्ये व्यक्त केला.

उद्घाटनानंतर आलेल्या प्रत्येक संस्थांचे गट पाडण्यात आले. त्यामध्ये गट-१ मध्ये शिक्षण, आरोग्य, संस्कार, दिव्यांग व्यक्ती विकास, सामजिक सुरक्षा, महिला विकास, पर्यावरण, प्रशिक्षण व संकीर्ण यासारख्या क्षेत्रामध्ये काम करणाऱ्या संस्थांचा समावेश करण्यात आला.

गट-१ मधील प्रशिक्षण व संकीर्ण मध्ये एकूण ७ संस्था सहभागी झाल्या होत्या. त्यामध्ये बिईंग व्हॉलेंटियर, सेवा सहयोग, स्पार्क, ज्ञानदा इन्स्टिट्यूट ऑफ फ्लो पाईपिंग टेक्नॉलॉजी, शिवसमर्थ प्रतिष्ठान, श्री शिवाजी रायगड स्मारक मंडळ आणि रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनी या संस्था सहभागी झाल्या होत्या या संस्थांच्या सत्रप्रमुखाची जबाबदारी **प्रा. सुधीर गाडे** यांच्याकडे होती. आलेल्या सर्व स्वयंसेवकांना आपापल्या कार्याची थोडक्यात माहिती होण्यासाठी सहभागी संस्थांनी

पी.पी.टी.द्वारे तयार केलेले सादरीकरण सत्रप्रमुखांनी केले. या गटामध्ये या सर्व संस्थांचे प्रतिनिधी उपस्थित होते. रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनीतर्फे **श्री. मनीष पुराणिक** यांनी प्रबोधिनीच्या विविध उपक्रमांविषयी माहिती दिली. प्रबोधिनीच्या संस्था बांधणी आणि नेतृत्व अध्ययन केंद्र या उपक्रमांतर्गत विविध कार्यशाळा, प्रशिक्षणं, चर्चासत्रे याद्वारे विविध सामाजिक घटकांच्या क्षमता विकास व संवर्धनासाठी योजील्या जाणा-या सर्व कार्यक्रमांचा उहापोह केला. प्रबोधिनीच्या कामामध्ये स्वयंसेवकांना कशा प्रकारे सहभागी होता येईल याविषयी माहितीपर मार्गदर्शन केले. म्हाळगी प्रबोधिनीबरोबर सुमारे ७ स्वयंसेवाकांनी त्यांचे योगदान देण्याची इच्छा व्यक्त केली. या स्वयंसेवकांची स्वतंत्र बैठक प्रबोधिनीच्या पुणे कार्यालयामध्ये घेण्याचे प्रयोजन आहे. याप्रसंगी श्री. बालाजी खरात यांनी येणा-या स्वयंसेवकांना प्रबोधिनीविषयी माहिती सांगण्यासाठीची सर्व तयारी केली होती तसेच संमेलनाच्या जागी प्रबोधिनीच्या विविध प्रकाशनांची विक्रीही केली.

या अभियानांतर्गत शहरातील विविध क्षेत्रामध्ये काम करणा-या ८१ स्वयंसेवी संस्थांनी नोंदणी केली होती. यासाठी समर्थ भारतने १० हजाराहून अधिक नागरिकांशी संपर्क केला होता, त्यानुसार सुमारे अडीच हजार स्वयंसेवकांची प्रत्यक्ष नोंदणी झाली. प्रत्येक स्वयंसेवकाला त्याच्या कौशल्यानुसार, आवडीनुसार आणि उपलब्ध वेळेनुसार सांस्कृतिक, सामाजिक आणि वैद्यकीय विभागांमध्ये काम करणा-या संस्थाबरोबर जोडून देण्यात आले.

संमेलनाचा समारोप विज्ञानभारतीचे केंद्रीय संघटनमंत्री **मा. श्री. जयंत सहस्त्रबुद्धे** यांच्या उपस्थितीत करण्यात आला.

याप्रसंगी प्रत्येक संस्थेला किती स्वयंसेवक मिळाले याचाही आढावा घेण्यात आला. भविष्यामध्ये प्रत्येक संस्थेकडून आणि स्वयंसेवकांकडून होणा-या कामाचा, अडचणींचा सातत्याने आढावा घेण्यात येईल आणि पुढील कामाची दिशा ठरवण्यात येईल. समर्थ भारत स्वयंसेवक जोडणीचा असाच कार्यक्रम रविवार, दिनांक १९ मार्च २०१७ रोजी पिंपरी-चिंचवड येथे होणार आहे.

मनीष पुराणिक
वरिष्ठ कार्यक्रम अधिकारी
रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनी, पुणे